I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 173 B.N.S.S)**

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

**1.** **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** पंढरपूर ग्रामीण **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0087 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/03/2026 02:33 वाजता

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

**3.** **(a)** **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

**1** **Day (दिवस):** शुक्रवार **Date from (दिनांक पासून):** 13/03/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 13/03/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ५ **Time From (वेळेपासून):** 13:12 तास **Time To (वेळेपर्यंत):** 14:01 तास

**2** **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 16/03/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 16/03/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 12:29 तास **Time To (वेळेपर्यंत):** 17:25 तास

**(b)** **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 17/03/2026 **Time (वेळ):** 01:59 तास

**(c)** **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 004 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 17/03/2026 01:59 तास

**4.** **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5.** **Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.** **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 14 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** मौजे उंबरगांव ग्रामपंचायत, कार्यालयासमोर व उंबरगाव, बस स्टप ता पंढरपूर ,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):** पंढरपूर ग्रामीण

**District (State) (जिल्हा (राज्य)):** सोलापुर ग्रामीण (महाराष्ट्र)

**2.** **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 14 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** मौजे उंबरगांव ग्रामपंचायत, कार्यालयासमोर व उंबरगाव, बस स्टप ता पंढरपूर,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):** पंढरपूर ग्रामीण

**District (State) (जिल्हा (राज्य)):** सोलापुर ग्रामीण (महाराष्ट्र)

**6.** **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a)** **Name (नाव):** रविंद्र हिम्मत लांभाते पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर

**(b)** **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c)** **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1988 **(d) Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):**भारत

**(e)** **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f)** **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g)** **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| **S. No. (अ.क्र.)** | **ID Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **ID Number (ओळखपत्र क्रमांक)** |
|---|---|---|

**(h)** **Occupation (व्यवसाय):**

**(i)** **Address (पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Address Type (पत्ता प्रकार)** | **Address (पत्ता)::** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलाप, पंढरपूर ग्रामीण, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलाप, पंढरपूर ग्रामीण, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

**(j)** **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-7038401100

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रशांत प्रकाश मुकरे | | | 1. 303,बी विंग,निर्मिती अपार्टम,Town/Village (शहर / गाव): ना कराड नाका,पंढरपूर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): पंढरपूर ग्रामीण,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | दत्तात्रय अभिमन्यू कांबळे | | | 1. Town/Village (शहर / गाव): उंबरगाव,ता पंढरपूर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): पंढरपूर ग्रामीण,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11.**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दि.17/03/2026

मी रविंद्र हिम्मत लांभाते, वय - 38 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 7038401100 समक्ष फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे माहे ऑगस्ट 2025 पासून पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दि.12/03/2026 रोजी सायंकाळच्या सुमारास आम्ही कार्यालयात असताना श्री प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांनी आम्हास त्यांचे कक्षामध्ये बोलावून घेतले आणि तक्रारदार सुनिल बबन पवार, रा. उंबरगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांनी फोन करून त्यांचेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार दिली असून त्याअनुषंगाने उदईकरोजी पडताळणी करून पुढील कारवाई करणेबाबत आम्हाला तोंडी आदेश दिले. त्यानुसार आम्ही दि.13/03/2026 रोजी आमचेकडील अंमलदार यांचे मार्फत उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, उपविभाग, दक्षिण सोलापूर या कार्यालयास पंच मिळणेबाबत पत्रव्यवहार करून दोन शासकिय पंच उपलब्ध करून घेतले. सुमारे 10.00 वा चे सुमारास 1) जिलानी महताबसाब मत्तेखाने, पद कनिष्ठ अभियंता व 2) अजय अशोक राठोड, पद सहायक अभियंता हे दोन्ही पंच साक्षीदार ला.प्र.वि सोलापूर या कार्यालयात आमच्या समक्ष हजर झाले. त्यावेळी मी दोघा पंचांना पोलीस निरीक्षक श्री शैलेश पवार यांची व माझी ओळख सांगुन तक्रारदार सुनिल बबन पवार, रा. उंबरगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उंबरगाव येथे जाऊन पडताळणी व पुढील कारवाई करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता, दोन्ही पंच साक्षीदार यांनी पंच म्हणून काम करण्यास त्यांची संमती दिली. त्यानंतर आम्ही आमच्या कार्यालयातील पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी, चालक पोकॉ/2026 श्रीराम यांना बोलावून घेतले आणि दोन्ही पंचांची ओळख करून देऊन गोपनीय कामकाजासाठी बाहेर जायचे असल्याचे सांगुन त्याकरीता आवश्यक सर्व साहित्य शासकीय वाहनात घेण्यास सांगितले. त्यानुसार गोपनीय कामाकरीता आवश्यक व्हाईसरेकॉर्डर, मेमरीकार्ड, लॅपटॉप, पिं्रटर, सील, अॅन्थ्रासीन पावडर, अल्ट्राव्हायोलेट दिवा इ. सर्व साहित्य ला.प्र.वि कडील शासकीय वाहन एम.एच.12 यु.सी 4108 या वाहनामध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर 10.27 वा चे सुमारास शासकीय वाहनातून आम्ही, पोनि पवार, दोन्ही शासकीय पंच, पथकातील अंमलदार असे सर्वजण आम्ही उंबरगावच्या दिशेने रवाना झालो. यादरम्यान तक्रारदार यांच्याशी संपर्कात राहून त्यांच्या सांगण्यानुसार सांगोला पंढरपूर रोडवरील खर्डी गावच्या अलीकडे तक्रारदार थांबलेल्या ठिकाणी आम्ही 12.15 वा. जाऊन पोहोचलो. सदरठिकाणी गेल्यानतर आम्ही तक्रारदार पवार यांना शासकीय वाहनामध्ये बोलावून पोनि पवार, दोन्ही शासकीय पंचांची, आमची व पथकातील अंमलदारांची ओळख करून दिल्यानंतर आम्ही त्यांना पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता व

त्यांची तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत विचारली असता त्यांनी त्यांचे नाव श्री.सुनिल बबन पवार असे असल्याचे सांगून, मौजे उंबरगाव येथे ग्रामपंचायतीच्यावतीने त्यांना घरकुलासाठी 1,20,000/- रू. मंजूर झाले असून सदर घरकुलाच्या तिस-या हप्त्याची रक्कम देताना ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत मुकरे व शिपाई दत्ता कांबळे यांनी 20,000/- रू घेतले असून आता शेवटच्या चौथ्या हप्त्याची रक्कम देण्यासाठी पुन्हा 20,000/- रू लाचेची मागणी करीत असून त्यांच्याविरूध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी अशा आशयाची तक्रार सांगुन त्यांची सविस्तर तक्रार स्वःहस्ताक्षरामध्ये लिहुन दिली. त्यानंतर सदरची तक्रार आम्ही व दोन्ही शासकीय पंचांनी वाचून त्यावर सहया केल्या.

तक्रारदार सुनिल बबन पवार यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पंच क्र.1 म्हणून जिलानी मत्तेखाने व पंच क्र.2 म्हणून अजय राठोड यांनी काम पाहण्याचे ठरले. त्यानंतर आम्ही तक्रारदार पवार, दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील सोनी कंपनीचे क्ष्क् ङकक्ग्ङक्ककङ क्ष्क्क्-छज्र्570क़ 5ज् च्ग्रज्त्र् क्ग्ङघ्. ग्ऋक्क क्ष्ग् क्तक्ष्ग्ऋ 1080938 व्हॉईस रेकॉर्डर व कज्ग् कंपनीचेे 08 जीबीचे मेमरीकार्ड सदर मेमरीकार्डवर कज्ग् 8क्रए ग्क्ष्क्ङग्र् च्क् क्तक् त्याच्या मागील बाजूस क्क ग्ग्8क्रक्10ऋज्र्6क़्-194 ज्र्घ्क्त 251104 च्ग् ग्ऋक्क क्ष्ग् च्रऋक्ष्ज्ऋग् कज्ग्च्रक़/8क्रए1125च्क असे वर्णनाचे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगितला. त्यानंतर आणखीन एक कज्ग् कंपनीचे 08 जीबीचे मेमरीकार्ड सदर मेमरीकार्डवर कज्ग् 8क्रए ग्क्ष्क्ङग्र् च्क् क्तक् त्याच्या मागील बाजूस क्क ग्ग्8क्रक्10ऋज्र्6क़्-194 ज्र्घ्क्त 251104 च्ग् ग्ऋक्क क्ष्ग् च्रऋक्ष्ज्ऋग् कज्ग्च्रक़/8क्रए1125च्क असे वर्णनाचे मेमरीकार्ड त्याचे पाकीटातून काढून ते मेमरीकार्ड पोना/30 नरोटे यांचे सॅमसंग गॅलक्सी ए-23 कंपनीचे मोबाईलमध्ये टाकून मोबाईलचे स्टोरेज पाथ एस.डी कार्ड सिलेक्ट करण्यात आले जेणेकरून निवेदनाचे व्हिडीओ चित्रीकरण करताना चित्रीकरणाचे फाईल मेमरीकार्डमध्ये जतन होईल. त्यानंतर तक्रारदार पवार व दोन्ही पंचांचे निवेदन पडताळणीपुर्व निवेदन 12.59 वा चे सुमारास व्हॉईसरेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करून घेण्यात आले. तक्रारदार आणि पंचांची निवेदने घेताना त्याचे व्हिडीओ चित्रीकरण वर नमुद मोबाईलच्या माध्यमातून पोना/30 नरोटे यांनी केले. त्यानंतर तक्रारदार पवार व पंच क्र.1 मत्तेखाने यांना पडताळणीकामी योग्य त्या सुचना देऊन 13.12 वा चे सुमारास आम्ही रवाना करून पडताळणी केली. पडताळणी दरम्यान ग्रामपंचायत शिपाई दत्ता कांबळे यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचे घरकुलाचे हप्त्याची रक्कम देण्यासाठी मला काल भावसाहेब म्हणल, त्याच्याकडन पैशे घ्या तुम्ही मागून असे म्हणून लाच मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी किती मग..एवढं लयी..लयी ही करू नका ओ असे म्हणाले असता, शिपाई कांबळे यांनी बर तु किती देतो ती सांग..मी सांगतो भाऊसाहेबला असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी आता आदीतर किती दिलं..आपल ठरलय असे म्हणून यापुर्वी दिलेल्या लाचेबद्दल विषय काढला असता शिपाई कांबळे यांनी दिल्यातकी दिल्यातकी असे म्हणून ती एकाला एवढ हायत असे म्हणत हाताची दोन बोटे दाखवत 20,000/- रू मागणी केली. त्यानंतर तक्रारदार यांनी तडजोड करण्याचा प्रयत्न केल्यावर शिपाई कांबळे यांनी मग आता तु किती देतो सांग, तुझ्या म्हणण्यानं सांग असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी तुम्हीच सांगा असे म्हणाले असता शिपाई कांबळे यांनी आम्ही..आम्ही म्हणतोय जेवढ दिलय तेवढ दे अजून असे म्हणून यापुर्वी 20,000/- रू दिल्याप्रमाणे तेवढेच देण्यास सांगितले. त्यावर तक्रारदार पवार यांनी एवढ असत्यात काय? असे विचारले असता, शिपाई कांबळे यांनी एकाला आम्ही घेतोय तेवढं.. असे सांगितले. त्यानंतर

तक्रारदार यांनी शिपाई कांबळे यांच्याशी लाच रकमेबाबत बरीच तडजोड करून वीस हजार नायत असे म्हणाले. त्यावर शिपाई कांबळे यांनी बर हा.. ठिक हाय. हा.. तुझ असे बोलून तक्रारदार यांना किती रक्कम देणार असे विचारले. त्यावर तक्रारदार यांनी दहा हजारचं असे सांगितले. त्यावर शिपाई कांबळे यांनी

बर कवा करतो सांग असे विचारले. तेव्हा तक्रारदार यांनी अध्र्या-पाऊण तासातच मी घरन घेऊन येतो पैशे..असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी भाऊसाहेबला म्हणजे कोणापशी देऊदी मला ही उग..असे म्हणाले, त्यावर शिपाई कांबळे यांनी अर तु माझ्याकड दी पैशे फकस्त..कोणाकड अन तसल सगळ फाट फोडत बसू नको उगं..असे बोलून लाच रक्कम त्यांच्याकडे देण्यास सांगितले. अशाप्रकारे शिपाई कांबळे यांनी यापुर्वी 20,000/- रू स्वीकारल्याचे मान्य करून शेवटच्या हप्त्याची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी मुकरे यांच्याकरीता व स्वतःकरीता तडजोडीवरून 10,000/- रू लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. सदरवेळी ग्रामपंचायत अधिकारी मुकरे हे उंबरगाव येथे उपस्थित नसल्याने त्यांची पडताळणी होऊ शकली नाही. तक्रारदार यांची तक्रार ग्रामपंचायत अधिकारी मुकरे व शिपाई कांबळे या दोघांविरूध्द असल्याने ग्रामपंचायत अधिकारी मुकरे यांची पडताळणी होणे आवश्यक होते, त्यामुळे दि.13/03/2026 रोजीची पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित करून सोमवारी दि.16/03/2026 रोजी ग्रामपंचायत अधिकारी मुकरे हे ग्रामपंचायत कार्यालयात आल्यावर त्यांची पडताळणी करण्याचे ठरले. सदरबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दि.16/03/2026 रोजी दोन्ही शासकीय पंच, आम्ही स्वतः, पोनि पवार, पोना/30 नरोटे, पोकॉ/766 किणगी, पोहेकॉ/1616 जाधव व चालक पोकॉ/2026 श्रीराम असे आम्ही सर्वजण शासकीय वाहन एम.एच 12 यु.सी 4108 व आमचे खाजगी वाहन, रजि.क्र. एम.एच.12, आर.टि.5575 या दोन्ही वाहनातून पडताळणी व सापळा कारवाईकरीता आवश्यक सर्व साहित्य सोबत घेऊन 10.00 वा चे सुमारास रवाना झालो आणि 11.50 वा चे सुमारास यापुर्वी तक्रारदार यांना भेटलेले खर्डी गावच्या अलीकडे जाऊन तक्रारदार यांना भेटलो. त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने दि.13/03/2026 रोजी पडताळणीवेळी वापरण्यात आलेल्या वर नमुद मेमरीकार्डमध्ये 12.21 वा व्हॉईसरेकॉर्डरव्दारे निवेदने रेकॉर्ड करून घेतले. सदरचे निवेदन रेकॉर्ड करून घेताना पोना/30 नरोटे यानी त्यांचे मोबाईलमधून दि.13/06/2026 रोजी व्हिडीओ चित्रीकरणासाठी वापरलेले वर नमुद मेमरीकार्डमध्ये व्हिडीओ चित्रीकरण केले. त्यानंतर तक्रारदार पवार व पंच क्र.1 मत्तेखाने यांना ग्रामपंचायत अधिकारी मुकरे यांची पडताळणी करण्याचे अनुषंगाने सर्व त्या आवश्यक सुचना देऊन 12.29 वा रवाना करून पडताळणी केली. पडताळणी दरम्यान तक्रारदार पवार व पंच क्र.1 मत्तेखाने हे उंबरगाव ग्रामपंचायत कार्यालयाकडे जात असताना वाटेतच त्यांना शिपाई दत्ता कांबळे भेटले, त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांच्या कामाच्या अनुषंगाने चर्चा करत चला समोरासमोर भाऊसाहेबची गाठ घेऊ असे म्हणाले. त्यावेळी शिपाई कांबळे यांनी भाऊसाहेब गेलेती म्हणल तर सांगोलला त्यांचे वडील अॅडमीट हायत असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी ग्रामपंचायत अधिकारी मुकरे यांच्याबाबत विचारणा केल्यावर शिपाई कांबळे यांनी पंधरा म्हणलेत पंधरा पंधरा असे म्हणून ग्रामपंचायत अधिकारी मुकरे यांनी 15,000/- रू देण्यास सांगितल्याचे निरोप देऊन ग्रामपंचायत अधिकारी मुकरे हे सांगोला येथे त्यांच्या वडीलांचे उपचाराकरीता सिध्दनाथ

हॉस्पिटलमध्ये गेल्याचे सांगितले. त्यामुळे तक्रारदार पवार व पंच क्र.1 मत्तेखाने यांना ग्रामपंचायत अधिकारी मुकरे यांची पडताळणी करण्यासाठी 15.16 वा चे सुमारास सांगोला येथील सिध्दनाथ हॉस्पिटलकडे रवाना करून त्यांची पडताळणी करण्यात आली. सदर पडताळणीवेळी ग्रामपंचायत अधिकारी मुकरे यांनी कधी तुम्हाला काय.. कधी संपवायचाय विषय असे विचारले. त्यावर तक्रारदार यांनी संपवायचा पण सकाळी गेलतो कांबळेकड.. कांबळे म्हणला ही करू म्हणून, ती म्हणला पंधरा हजारच म्हणायला लागला. आदी दहा हजार मागिततय असे सांगितले. त्यावर मुकरे यांनी पण आता तस कांबळेला मी वीस सांगितल होत असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी परिस्थिती नाय ओ आपली तेवढ असे म्हणून तडजोड केला असता कमीत कमीच सांगितल. कांबळेन तर पंधरावर आणलय.. वीस सांगितल होत मी कांबळेला. दहा दहा प्रत्येकालाच करतोय तुमच एकट्‍ाचच नाही. असे बोलून स्पष्टपणे लाच मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी तडजोड करण्याचा प्रयत्न केल्यावर मुकरे यांनी ही करा.. बारा करा फायनल असे म्हणून 12,000/- रू लाच मागणी करून आता माझा मान राखा. बारा करा. कांबळेकड पोहच करा असे सांगून 12,000/- रू लाच रक्कम शिपाई कांबळे यांच्याकडे देण्यास सांगितले.

त्यानंतर उंबरगावचे अलीकडे तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक लिहून घेणे, तक्रारदार व दोन्ही पंचांना अॅन्थ्रासीन पावडरची माहिती देऊन त्याचे प्रात्यक्षिक करणे व हजर केलेल्या नोटांना पावडर लावणे इ. सापळापुर्व कारवाई करून, सापळा कारवाईच्या अनुषं प्रशांत प्रकाश मुकरे, वय - 45 वर्षे, पद - ग्रामपंचायत अधिकारी उंबरगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर रा.303, बी विंग, निर्मिती अपार्टमेंट, जुना कराड नाका, पंढरपूर व दत्तात्रय अभिमन्यू कांबळे, वय - 45 वर्षे, पद - शिपाई ग्रामपंचायत उंबरगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर, रा. मु.पो उंबरगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर गाने तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अंमलदारांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या. सदरवेळी ग्रामपंचायत शिपाई कांबळे हे उंबरगाव येथे असून ग्रामपंचायत अधिकारी मुकरे हे सांगोला येथे असल्याने दोघांना यशस्वी सापळा कारवाईनंतर एकाचवेळी ताब्यात घेण्याच्या अनुषंगाने दोन पथके तयार करण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंचांचे सापळा कारवाईच्या अनुषंगाने वर नमुद मेमरीकार्डमध्ये 16.26 वा व्हॉईसरेकॉर्डरव्दारे निवेदने रेकॉर्ड करून घेतले. सदरचे निवेदन रेकॉर्ड करून घेताना पोना/30 नरोटे यानी त्यांचे मोबाईलमधून वर नमुद मेमरीकार्डमध्ये व्हिडीओ चित्रीकरण केले. त्यानंतर तक्रारदार पवार व पंच क्र.1 मत्तेखाने यांना शिपाई कांबळे यांची भेट घेण्यासाठी 16.34 वा उंबरगाव येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही स्वत:, पंच क्र.2, पोहेकॉ/1616 जाधव, पोना/30 नरोटे व चालक पोकॉ/2026 श्रीराम असे शासकीय वाहनातून उंबरगावच्या दिशेने रवाना झालो आणि पोनि पवार व पोकॉ/766 किणगी हे आमच्याकडील खाजगी चारचाकी वाहनातून सांगोला येथील सिध्दनाथ हॉस्पिटलकडे रवाना झाले.

सापळा कारवाईदरम्यान तक्रारदार पवार व पंच क्र.1 मत्तेखाने हे दोघे उंबरगाव बस स्टॉपजवळ जाऊन ग्रामपंचायत शिपाई कांबळे यांना फोन करून उंबरगाव बस स्टॉपजवळ बोलावून घेतले. ग्रामपंचायत शिपाई कांबळे हे उंबरगाव बस स्टॉपजवळ आल्यावर तक्रारदार यांनी त्यांना आलता फोन? असे विचारले. त्यावर शिपाई कांबळे यांनी दे आता तुझ्या ह्राच्यान.. काय आता असे म्हणून लाच रकमेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी त्यांच्या शर्टाच्या समोरील डाव्या बाजूच्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम उजव्या हाताने काढून शिपाई कांबळे यांच्यासमोर धरली. त्यावेळी

शिपाई कांबळे यांनी सदर रक्कम उजव्या हाताने स्वीकारले. तेव्हा तक्रारदार यांनी मोज की. मोजून घे. बारा सांगितल होत असे म्हणाले. शिपाई कांबळे यांनी लाचेची रक्कम स्वीकारल्यावर त्यांना नोटांवर अॅन्थ्रासीन पावडर जाणवल्याने त्यांनी आईला ही काय लावलस असे विचारून पिठातन आला का कुठ असे म्हणाले. त्यानंतर नोटांना स्पर्श केल्यानंतर जाणवत असलेल्या पावडरबाबत चर्चा सुरू असताना तक्रारदार यांनी त्यांचा डावा हात डोक्यावरून फिरवून लाच स्वीकारल्याचा इशारा दिला. त्यावेळी त्या परिसरात सापळा लावून थांबलेले आम्ही सर्वजण शिपाई कांबळे यांना 16.59 वा चे सुमारास रंगेहात ताब्यात घेतले. शिपाई कांबळे यांना ताब्यात घेण्यात आल्यावर सदरठिकाणी त्यांचे उजव्या हातात धरून ठेवलेली लाच रक्कम पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले, त्यानंतर पंच क्र.2 राठोड यांनी सदर नोटांच्या क्रमांकाची तपासणी केली असता ते तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांशी तंतोतंत जुळून आले. त्यानंतर सदरठिकाणी कृत्रिम अंधार करून शिपाई कांबळे यांच्या दोन्ही हाताची व त्यांच्या ताब्यातून मिळालेल्या नोटांची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रका प्रशांत प्रकाश मुकरे, वय - 45 वर्षे, पद - ग्रामपंचायत अधिकारी ऊंबरगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर रा.303, बी विंग, निर्मिती अपार्टमेंट, जुना कराड नाका, पंढरपूर व दत्तात्रय अभिमन्यू कांबळे, वय - 45 वर्षे, पद - शिपाई ग्रामपंचायत ऊंबरगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर, रा. मु.पो ऊंबरगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर शात तपासणी करता त्यावर अॅन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. शिपाई कांबळे यांची प्राथमिक तपासणी करण्यात आल्यानंतर आम्ही झालेल्या यशस्वी सापळा कारवाईची माहिती पोनि पवार यांना दिल्यानंतर त्यांनी व पोकॉ/766 किणगी यांनी सांगोला येथील सिध्दनाथ हॉस्पिटल येथे असलेले ग्रामपंचायत अधिकारी मुकरे यांना 17.25 वा ताब्यात घेतले. त्यानंतर दोन्ही पथके शासकीय विश्रामगृह पंढरपूर येथे आल्यावर सदरठिकाणी संभाषणाचा उतारा काढून सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला.

तरी दि.13/03/2026 रोजी तक्रारदार सुनिल बबन पवार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.13/03/2026 रोजी 13.12 वा. पासून 14.01 वा. चे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईदरम्यान ऊंबरगाव ग्रामपंचायतीचे शिपाई दत्तात्रय अभिमन्यू कांबळे यांनी तक्रारदार यांना प्रधानमंत्री आवास योजनेमधून मंजूर झालेल्या घरकुलाचे शेवटच्या हप्त्याची रक्कम देण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत प्रकाश मुकरे यांच्यावतीने तडजोडीवरून 10,000/- रू लाच मागणी केली. तसेच दि.16/03/2026 रोजी 12.29 वा. पासून 17.25 पर्यंत या कालावधीमध्ये करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान शिपाई दत्तात्रय अभिमन्यू कांबळे यांनी यापुर्वी केलेल्या लाच मागणीच्या रकमेत वाढ करून ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत प्रकाश मुकरे यांच्याकरीता 15,000/- रू लाचेची मागणी केली. त्यानंतर ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत प्रकाश मुकरे यांची पडताळणी केली असता त्यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडीवरून शेवटी 12,000/- रू लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम शिपाई दत्तात्रय कांबळे यांच्याकडे देण्यास सांगितले. त्यानंतर करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान ऊंबरगाव ग्रामपंचायतीचे शिपाई दत्तात्रय कांबळे यांनी तक्रारदार यांच्याकडून ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत मुकरे यांच्यासाठी व स्वत:साठी 12000/- रू लाचेची रक्कम स्वतः स्वीकारून अपराधास अपप्रेरणा दिली. म्हणून प्रशांत प्रकाश मुकरे, वय - 45 वर्षे, पद - ग्रामपंचायत अधिकारी ऊंबरगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर रा.303, बी विंग, निर्मिती अपार्टमेंट, जुना कराड नाका, पंढरपूर व दत्तात्रय अभिमन्यू कांबळे, वय - 45 वर्षे, पद - शिपाई ग्रामपंचायत ऊंबरगाव, ता.

पंढरपूर, जि. सोलापूर, रा. मु.पो उंबरगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांचेविरूध्द मी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7, 7-अ व 12 प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद देत आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला.

समक्ष

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Rekha Chandrakant Ghanwat (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**Name (नाव):** Rekha Chandrakant Ghanwat

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1981 | | - | | चेचक: क्र. |
| 2 | पुरुष | 1981 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग / वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)